# पोलीस अधीक्षक कार्यालय अकोला

## “प्रेस नोट”

w.www.akolapolice.gov.in. दिनांक- 04/09/2025

..................................................................................................................................................

## पोलीस अधीक्षक अकोला यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस दलाला AI कवच अंतर्गत Chat GPT प्रशिक्षण कार्यशाळा

अकोला पोलीस दलातर्फे पोलीस अधीक्षक श्री.अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित ChatGPT प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.आजच्या युगात कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence) व आधुनिक साधनांचा उपयोग कार्यालयीन कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी उपयुक्त ठरत आहे.याच पार्श्वभूमीवर या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यशाळेत श्री. किशन पनपालिया हे आज AI आणि मार्केटिंग क्षेत्रातील जागतिक स्तरावर प्रसिद्ध चेहरा आहेत. त्यांना Forbes Under 30, IMPACT 30 Under 30 यांसारख्या सन्मानांनी गौरविण्यात आले आहे आणि ते TEDx व Josh Talks चे स्पीकर देखील आहेत.असे प्रसिद्ध मार्गदर्शक यांनी कार्यशाळेला मार्गदर्शन करताना ChatGPT चा दैनंदिन कार्यालयीन कामात कसा उपयोग करता येऊ शकतो,माहिती पटकन मिळविण्यासाठी,पत्रव्यवहार तयार करण्यासाठी तसेच अहवाल लेखनात वेळ वाचविण्यासाठी हे साधन कसे उपयुक्त ठरते याबाबत सविस्तर माहिती दिली. त्यांनी प्रात्यक्षिकाद्वारे ChatGPT चा वापर दाखवून उपस्थित अधिकाऱ्यांना व कर्मचारी वर्गाला प्रत्यक्ष अनुभव दिला.दैनंदिन कामकाजासाठी E-Office चा नियमित वापर नागरिकांसाठी आपले सरकार पोर्टल द्वारे तक्रारी व सेवा जलदगतीने हाताळणे सर्व फाईल्स,पत्रव्यवहार आणि रेकॉर्डचे डिजिटायझेशन आता ChatGPT सारख्या आधुनिक AI साधनांचा वापर करून दैनंदिन काम अधिक वेगवान,अचूक आणि कार्यक्षम करणे या सर्व उपक्रमांमुळे अधिकाऱ्यांचा वेळ वाचतो असून, गुन्हे उकलणे,नागरिकांना सेवा देणे आणि धोरणात्मक कामांवर जास्त लक्ष देता येते.या प्रशिक्षण कार्यशाळेत मंत्रालयीन कर्मचारी, विविध विभागातील पोलीस अधिकारी तसेच कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.कार्यशाळेच्या माध्यमातून सहभागींसमोर आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करण्याची संधी उपलब्ध झाली.यामुळे पोलीस दलातील कामकाजाची गती,कार्यक्षमता व पारदर्शकता वाढीस लागेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.ही केवळ एक कार्यशाळा किंवा उपक्रम नसून अकोल्याचा अभिमानाचा प्रवास आहे. हे ध्येय म्हणजे तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून अकोल्यातील नागरिकांसाठी अधिक विश्वासार्ह, जलद आणि आधुनिक पोलीस सेवा उपलब्ध करण्याची नवी पायरी आहे.

कार्यक्रमाच्या शेवटी प्रशिक्षक श्री.किशन पनपालिया यांचा सन्माननीय सत्कार पोलीस अधीक्षक श्री. अर्चित चांडक यांच्या हस्ते करण्यात आला. त्यांनी आपल्या मनोगतात, पोलीस दलाने तंत्रज्ञानाशी सातत्याने जुळवून घेत राहणे गरजेचे असल्याचे सांगितले. अशा प्रशिक्षणामुळे पोलीस दलातील अधिकारी व अंमलदार यांचा आत्मविश्वास वाढतो आणि कामकाज अधिक सोपे व प्रभावी होते, असे त्यांनी नमूद केले.

पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क अधिकारी
अकोला जिल्हा पोलीस दल

प्रति, मा.संपादक,कृपया आपल्या दैनिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्दी देण्यास विनंती आहे.